ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख ३० मे, १९५६ | अंक २१

## विविध माहिती

**अणुशक्तीवरील विजेचा खर्च**—भारताच्या अणुशक्तीविषयक खात्यानें अणुशक्तीचा उपयोग करून वीज निर्माण करण्यासाठीं जो खर्च येईल त्याचा अभ्यास चालविला आहे. ह्या बाबतींत कांहीं माहितीहि गोळा करण्यांत आली आहे. तीवरून असें दिसून आलें आहे कीं, ज्या ठिकाणीं पाण्याच्या प्रवाहावर वीज निर्माण करणें शक्य नाहीं अगर ज्या ठिकाणीं कोळशावरील वीज महाग पडेल त्या ठिकाणीं अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणें परवडेल.

**सीलोन—चीन व्यापार**—सीलोनच्या सरकारनें चीनपासून ४० लाख रुपये किंमतीचें सोयाबीनचें धान्य खरेदी करण्याचा करार केला आहे. सीलोन व चीन ह्यांच्या दरम्यान चीनला रबर विकण्याचा व्यवहार पूर्वीं झाला होता. ह्या रबराच्या किंमतीच्या पोटीं सोयाबीनची किंमत वळती करून घेण्यांत येणार आहे. सीलोननें सोयाबीनची किंमत पौंडी चलनांत दिली आहे.

**गया शहराची सुधारणा**—गया ह्या इतिहासप्रसिद्ध शहराची सुधारणा करण्याचें बिहारच्या सरकारनें ठरविलें आहे. घरबांधणी, रस्ते, पाणीपुरवठा व गलिच्छ वस्त्यांचें निर्मूलन हीं कामें करण्यांत येणार आहेत. सरकारनें ह्या कामासाठीं इंप्रूव्हमेंट ट्रस्टची स्थापना केली असून पांच वर्षांपर्यंत दरवर्षी १ लाख रुपयांची मदत सरकारकडून करण्यांत येईल. गया हें हिंदूंचें यात्रास्थल असून हौशी प्रवासीहि त्या शहराला भेट देत असतात.

**भारतीय कापडाला मागणी**—नॉर्वेच्या मुंबईमधील व्यापारी प्रतिनिधीनें अशी माहिती सांगितली कीं, स्वीडन व नॉर्वे ह्या देशांतून भारतीय कापडाला चांगली मागणी आहे. नॉर्वे व हिंदुस्थान ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार झालेला असून उभयता देशांनीं एकमेकांना पुरवावयाच्या मालाची यादी अधिक विस्तृत करण्याविषयीं नुकतीच चर्चा करण्यांत आली. आशिआंतील इतर देशांशीं व्यापार वाढविण्याचे प्रयत्नहि नॉर्वे करीत आहे.

**मुंबई ते पॅरिस मोटारीची सफर**—मुंबईपासून पॅरिसपर्यंत मोटारीनें प्रवास करण्याची व्यवस्था एक फ्रेंच नागरिक करीत आहे. एका फ्रेंच कंपनीनें ह्या कामीं पुढाकार घेतला असून प्रवासाची नियमित सोय झाल्यावर भारताहून युरोपला मोटारीच्या मार्गानें जातां येईल. ह्या सफरीस ४८ दिवस लागतील व तीसाठीं जाता-येता ६०८ पौंड खर्च येईल, असा अंदाज आहे.

**साखरेचे सहकारी कारखाने**—महाराष्ट्रांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारे साखरेचे १२ नवे कारखाने लवकरच काढण्यांत येणार आहेत. अशा प्रकारचे कारखाने काढण्याची योजना १९४८ सालींच मुक्रर करण्यांत आली होती. पण अनेक अडचणीमुळें ती प्रत्यक्षांत आणण्यास विलंब लागला. बागलाण-मालेगांव सहकारी कारखान्याचा पायाभरणी समारंभ नुकताच झाला.

**क्षयरोग्यांसाठीं इस्पितळ**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत रतलाम येथें क्षयरोग्यांवर शस्त्रक्रिया करण्यासाठीं एक इस्पितळ उघडण्यांत येणार आहे, अशी माहिती मध्यभारत सरकारच्या एका आरोग्याधिकाऱ्यानें सांगितली आहे. ह्या इस्पितळासाठीं १६,००० रुपये खर्च येईल. त्याशिवाय परिचारिकांना शिक्षण देऊन तयार करण्यासाठींहि एक केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे.

**कोसी नदीच्या काठाचे बंधारे**—कोसी नदीला येणाऱ्या पुराला आळा घालण्यासाठीं कांहीं बंधाऱ्यांचें काम लोकांच्या स्वयंस्फूर्त मदतीनें करण्यांत येत आहे. ह्या बंधाऱ्यांपैकीं १७ मैल लांबीचे बांध स्वयंसेवकांनीं १०० दिवसांत पुरे केले. हें काम भारत सेवक समाजातर्फे करण्यांत येत आहे. दरभंगा आणि दुसऱ्या एका जिल्ह्यांतील लाखों लोकांना बंधाऱ्यामुळें निश्चिति प्राप्त होईल.

**खेळाच्या सामानाचें उत्पादन**—खेळांना लागणारें सर्व प्रकारचें साहित्य भारतांत ग्रामोद्योगाच्या पद्धतीनें लवकरच तयार होऊं लागेल. ह्या धंद्याला उत्तेजन देण्यासाठीं भारतीय सरकारनें एक योजना आंखली आहे. साहित्य तयार करण्याचें शिक्षण घेण्यासाठीं कांहीं तरुणांना लवकरच परदेशांत पाठविण्यांत येणार आहे.

**शेतावरील मजुरासंबंधीं चौकशी**—१९५६–५७ सालीं भारतामधील शेतीवर काम करणाऱ्या मजुरासंबंधीं चौकशी करण्यांत येणार आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ह्या बाबतींत कामास सुरवात झाली असून प्राथमिक स्वरूपाचें काम जुलै महिनाअखेर पूर्ण होईल. त्यानंतर वर्षभर चौकशीचें काम चालेल आणि अहवाल तयार करण्यांत येईल.

**भारतांतील चर्चेसना मदत**—१९५५ सालीं भारतामधील निरनिराळ्या चर्चेसना आर्थिक मदत म्हणून परदेशांतून ९ कोटी रुपयांहून थोडी अधिक रक्कम आली, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ह्यापैकीं किती रक्कम धर्मप्रचारासाठीं व किती धर्मादायासाठीं खर्च करण्यांत आली, त्याची सरकारला माहिती नाहीं असेंहि सांगण्यांत आलें.

## दि बेळगांव बँक लि. मधील समारंभ

दि बेळगांव बँक लि. च्या अधिकारीवर्गांतील, रिझर्व्ह बँकेनें चालविलेल्या कॉलेजांतील ट्रेनिंग कोर्स पुरा करून आलेले इन्स्पेक्टर्स श्री. पंडित, श्री. कामत व चीफ अकौंटंट श्री. आर. आर. कुलकर्णी ह्यांचा गुणगौरव बँकेच्या दिवाणखान्यांत मंगळवार दि. २२ मे, १९५६ रोजीं श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ" ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. त्यावेळीं बँकेचे संचालक, व्यापारी, कारखानदार व बँकेचे नोकर हे उपस्थित होते. प्रारंभीं, बँकेचे चेअरमन, श्री. गो. वि. सराफ, ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत बँकिंगच्या धंद्यांतील ट्रेनिंगचें महत्त्व वर्णन केलें; आणि तज्ज्ञांच्या हाताखालीं शिक्षण घेतल्यानें कार्यक्षमता कशी वाढते, तेंच काम अधिक चांगलें कसें करतां येतें, ह्याचें मार्मिक विवेचन केलें. श्री. काळे ह्यांनीं ट्रेनिंग कोर्स पुरा करून आलेल्यांचें अभिनंदन करून, बेळगांव बँकेच्या संचालकांची कार्यनिष्ठा, समाजसेवेची कळकळ, कर्तव्यकठोरता, इत्यादींचा उल्लेख केला आणि त्याला कार्यक्षम दैनंदिन कारभाराची जोड असल्याचें पाहून समाधान व्यक्त केलें. बँकेची भरभराट झाली, तरच तिला आपलें कार्य चांगल्या रीतीनें पार पाडतां येतें; ह्यासाठी संचालकांप्रमाणें अधिकारी व नोकर-वर्ग ह्यांनींहि बँकेच्या प्रगतीस मनोभावें हातभार लावला पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. व्यापारी व कारखानदार ह्यांनीं बँकेकडे कर्ज मिळण्याचें ठिकाण एवढ्याच दृष्टीनें न पहातां, बँकेच्या समृद्धींत स्वतःचें हित आहे हें लक्षांत ठेवून वागावें, असेंहि त्यांनीं सुचविलें. बँकेचा नफा व तिची भरभराट ह्यांतच तिचे संचालक, अधिकारी, नोकर, ठेवीदार व कर्जदार ह्या सर्वांचें हित एकत्रित झालेलें आहे, हें त्यांनीं स्पष्ट केलें. बेळगांव बँकेचा अधिकाधिक उत्कर्ष होवो, असा श्री. काळे ह्यांनीं समारोप केला.

## संगमनेर येथील सेक्रेटरी शिक्षणवर्गाचा उद्घाटन समारंभ

संगमनेर येथें ता. ७-५-५६ पासून चालू असलेल्या सेक्रेटरी शिक्षणवर्गाचा उद्घाटन समारंभ तारीख १७-५-१९५६ रोजीं दुपारीं ४ वाजतां येथील सरकारी ट्रेनिंग कॉलेजचे इमारतींत साजरा झाला. त्या भागाचे डेप्युटी कलेक्टर श्री. एस्. एस्. मालपाठक हे अध्यक्षस्थानीं होते.

प्रारंभीं को. ट्रे. इन्स्पेक्टर श्री. देशमुख यांनीं शिक्षणवर्गासंबंधीं प्रास्ताविक माहिती सांगितली. ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपाल श्री. सुर्वे, ह्या भागाचे ऑडिटर श्री. दलाल, तालुका मुख्याध्यापक श्री. पाठक, इत्यादि वक्त्यांचीं सहकारी चळवळ व सेक्रेटरीच्या जबाबदाऱ्या इत्यादिसंबंधीं उपदेशपर भाषणें झालीं.

अध्यक्षीय समारोपांत श्री. मालपाठक म्हणाले, "सहकारी चळवळ यशस्वी करण्यासाठीं सेक्रेटरीवर फार मोठी जबाबदारी आहे. सोसायटींतील पंच कमिटींतसुद्धां बहुसंख्य सभासद अशिक्षित असतात. त्यांना दैनंदिन मार्गदर्शन करून सोसायटीचा कारभार प्रगतिपथावर चालवयाचा असेल तर तिला विश्वासू व माहितगार सेक्रेटरीची जोड हवी. सेक्रेटरीशिपच्या निमित्तानें त्यांना लोकसेवेची जी संधी मिळते तिचा सदुपयोग करावा व देशाचे प्रगतीचे कामीं त्यांनीं हातभार लावावा. त्यासाठी सेक्रेटरींना हवें असलेलें ज्ञान त्यांनीं ह्या वर्गांत कळकळीनें अभ्यास करून मिळवावें." तालुक्याचे सुपरवायझर श्री. बनकर यांनीं आभार मानले.

---

## तातडीच्या आय. ए. एस. भरतीसाठी अर्ज

इंडियन अॅड्मिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसमध्यें तातडीनें भरती करण्यांत येणार आहे, त्यासाठी ३०,००० अर्ज आले आहेत. ३०० रु. किमान दरमहा पगार असणारांनाच अर्ज करतां येतो; नाहींतर अर्जांची संख्या कितीतरी वाढली असती.

---

## नेहरूंच्या पुस्तकाचें रुमेनियन भाषांतर

पं. नेहरूंच्या "दि डिस्कव्हरी ऑफ इंडिया" ह्या पुस्तकाचें रुमेनियन भाषांतर प्रसिद्ध झालें आहे.

---

## कै. कॅ. जठार ह्यांचें स्मारक

'कश्मीर प्रिन्सेस'च्या अपघातांत मृत्यु पावलेले कॅप्टन जठार व त्यांचे सहकारी, ह्यांचें स्मारक करण्यासाठी कमिटी नेमण्यांत आली आहे. श्री. एस्. के. पाटील तिचे अध्यक्ष आहेत. सांताक्रूझ विमानतळावरील नव्या इमारतींत कॅ. जठारांचा पुतळा ठेवण्यांत येईल.


**बँक ऑफ पूना लिमिटेड**

**( शेड्यूल्ड बँक )**

—मुख्य कचेरी : ४९५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

(१) ३६१ सदाशिव, पुणें.
(२) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
(३) सोलापूर. (४) सांगली.

—व्याजाचे दर—

चालू ठेव-अर्धा टक्का. सेव्हिंग्ज-दोन टक्के.
१२ महिन्यांच्यापुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

★ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.



तमाम दंतरोगांवर

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# अर्थ

बुधवार, ता. ३० मे, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मोठ्या शहरांतील नौकरी करणाऱ्या स्त्रिया

हिंदुस्थानांतील मोठ्या शहरांतून नौकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या गेल्या कांहीं वर्षांत खूपच वाढली आहे. शहरांतील राहण्याच्या जागेच्या टंचाईमुळें इतरांबरोबर अशा स्त्रियांचीहि कुचंबणा चालू आहे. ह्या स्त्रियांसाठी वसतिगृहें काढण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं मध्यवर्ती समाजहित बोर्डानें एक कमिटी नेमली होती. कमिटीनें ह्या बाबतींत केलेल्या अहवालावर चर्चा करण्यासाठी दिल्ली येथें बोर्डाची बैठक भरली होती. मोठ्या शहरांतून काम करणाऱ्या कारकून, टंकलेखक, परिचारिका आणि टेलिफोनवर काम करणाऱ्या स्त्रिया ह्यांच्यासाठी वसतिगृहें स्थापन करावीं असें बोर्डानें ठरविलें आहे. मात्र ह्या स्त्रियांचें मासिक उत्पन्न ५० ते २०० रुपयांपर्यंतच असलें पाहिजे; तरच त्यांना वसतिगृहाचा फायदा मिळणार आहे. ह्या कामांत अशा प्रकारच्या संस्था चालविणाऱ्या खाजगी संघटनांचें सहकार्य घेण्याचेंहि बोर्डानें ठरविलें आहे. ज्या ठिकाणीं अशा वसतिगृहांची सोय नाहीं, तेथें त्यांची स्थापना करण्यासाठीहि खाजगी संघटनांचें सहकार्य घेण्यांत येणार आहे. अशा संघटनांना बोर्डाकडून कांहीं आर्थिक मदत देण्यांत येईल. सध्या चालू असलेल्या अशा प्रकारच्या संस्थांनीं अधिक स्त्रियांची राहण्याची सोय करावी, वसतिगृहांत राहणाऱ्या स्त्रियांना सामाजिक जीवनाचीं व करमणुकीचीं साधनें पुरवावीं आणि ह्या कामासाठी लागणाऱ्या नोकरवर्गाचा पगार देतां यावा, म्हणून ही मदत देण्यांत येणार आहे. एकाच शहरांत अशा प्रकारचीं अनेक वसतिगृहें स्थापन करण्याच्या विरुद्ध बोर्ड आहे. त्याचप्रमाणें, वसतिगृहांची स्थापना करतांना शहराच्या निरनिराळ्या भागांतील नौकरदार स्त्रियांना त्यांचा उपयोग व्हावा अशी दृष्टि स्वीकारण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्या बाबतींत लोकांनीं स्वेच्छेनें चालविलेल्या संस्थांकडून अर्ज मागविण्याचा बोर्डाचा विचार आहे. एखादी नवीन संस्था असें वसतिगृह स्थापन करून चालविण्यास तयार असेल, तर तिनेंहि अर्ज करण्यास हरकत नाहीं. बोर्डाची पुढील बैठक १९५६ च्या जुलै महिन्यांत भरणार असून त्यावेळीं मदतीसाठीं आलेल्या अर्जांचा विचार करण्यांत येईल. लोकांच्या स्वेच्छेच्या प्रयत्नांस आधी मदत करण्याचें बोर्डाचें धोरण राहील.

---

## कुटुंबनियोजनाला सरकारी नौकरांचा विरोध !

मद्रास येथें नॉन-गॅझेटेड ऑफिसर्स कॉन्फरन्सचें ३४ वें अधिवेशन भरलें होतें. ह्या प्रसंगीं जमलेल्या सरकारी नौकरांनीं कुटुंबनियोजनासंबंधीं जी विरोधी वृत्ति प्रकट केली, ती विस्मयजनक आहे असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. मद्रासचे शिक्षणखात्याचे चिटणीस श्री. गोपालस्वामी परिषदेंत भाषण करीत असतांना म्हणाले, कीं सरकारी नौकरांनीं आपल्या कुटुंबांत प्रवेश करणाऱ्या अपत्यांची संख्या मर्यादित ठेवली पाहिजे. त्याबरोबर श्रोत्यांपैकीं कांहीं जणांनीं हा त्याग करण्याची आमची तयारी नाहीं, असें ओरडून गडबड करण्यास सुरवात केली आणि श्री. गोपालस्वामी ह्यांना अखेर आपलें भाषण आटोपतें घ्यावें लागलें! दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कुटुंब नियोजनावर अधिक जोर देण्यांत येत असतांना एका राज्यांतील सरकारी नौकरांची ही वृत्ति समजण्यास कठीण अशीच म्हटली पाहिजे. परिषदेंत अशी एक सूचना करण्यांत आली कीं, ज्या नौकरांना तीनपेक्षा अधिक मुलें असतील त्यांना मुलांसाठीं खास भत्ता देण्यांत यावा. ह्या विषयासंबंधीं बोलतांना श्री. गोपालस्वामी म्हणाले कीं, देशांतील आर्थिक परिस्थिति फारशी चांगली नसल्यानें नॉन-गॅझेटेड ऑफिसर्स व सरकार दोघेहि सारख्याच अडचणींत आहेत. सरकार व लोक ह्यांना सध्यां ज्या अडचणींना तोंड द्यावें लागत आहे त्यांचें मूळ झपाट्यानें वाढत जाणाऱ्या लोकसंख्येंत आहे. लोकांनीं कुटुंबनियोजनाचा आश्रय करून आपल्या हयात असलेल्या मुलांच्या शिक्षणाची व इतर गरजांची सोय करावी; इतकें बोलल्याबरोबर सभेंत आरडाओरडीला प्रारंभ झाला. त्यानंतर मद्रासचे नॅशनल सेव्हिंग्ज ऑफिसर श्री. अय्यंगार बचतीसंबंधीं बोलूं लागले. पण त्यांनाहि 'बचत करण्यास सवड नाहीं. आम्हांला तुमचा सल्ला नको' असा ओरडा करण्यांत येऊन खालीं बसविण्यांत आलें.

---

## कॉफीच्या किंमती घसरण्याची भीति

ब्रिटनमधील 'फिनॅन्शिअल टाइम्स' ह्या वृत्तपत्रानें 'इंटरनॅशनल इन्व्हेस्टमेंट' ह्या नांवाचें नवें नियतकालिक प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला आहे. नियतकालिकाचा पहिला अंक नुकताच प्रसिद्ध करण्यांत आला असून त्यांत कॉफीच्या व्यापाराच्या भवितव्याविषयीं विचार व्यक्त करण्यांत आले आहेत. १९६० च्या सुमारास जगांतील कॉफीचें उत्पादन भरमसाट वाढेल आणि त्यामुळें कॉफीच्या किंमती घसरगुंडीला लागतील अशी चिंता नियतकालिकानें व्यक्त केली आहे. त्यानंतर संभाव्य मंदीची कारण-मीमांसा करतांना 'इंटर नॅशनल इन्व्हेस्टमेंट' म्हणतें कीं अमेरिकेची लोकसंख्या वाढत आहे; पण त्या प्रमाणांत कॉफीचा दर माणशीं खप मात्र वाढलेला दिसून येत नाहीं. अमेरिकेंत कॉफीचा खप अधिक होण्यासाठी अधिक जोराचे प्रयत्न करण्यांत येतील असें दिसतें. पश्चिम युरोपांतील राष्ट्रें कॉफीच्या आयातीवर जबर जकात घेत असतात. त्यामुळें कॉफीच्या प्रसारांत अडचणी उत्पन्न झाल्या आहेत. आयातीवरील जकात कमी करण्यांत आली तर कॉफीचा खप वाढेल हें जर्मनीच्या उदाहरणावरून दिसून येत आहे. पश्चिम जर्मनीनें आयात-कर कमी केल्याबरोबर तेथील कॉफीच्या खपाचें प्रमाण वाढलें आहे. कॉफीच्या व्यापाराला भरभराटीचे दिवस येण्यासाठी पूर्व युरोपांतील देशांच्या मागणीचेंहि पुनरुज्जीवन घडवून आणावयास हवें. पोलंड, झेकोस्लोव्हाकिआ आणि रुमेनिआ ह्या देशांतून दुसऱ्या महायुद्धापूर्वी कॉफीला चांगली मागणी येत होती. कॉफीच्या किंमती कमी ठेवण्यांत आल्या, तर व्यापाराच्या विस्ताराला चांगली मदत होईल असें मत त्या नियतकालिकानें व्यक्त केलें आहे.

### वाढत्या किंमतीसंबंधीं इषारा

नियोजन-समितीच्या अर्थशास्त्रज्ञांच्या मंडळाचे सभासद श्री. बी. आर. शेणॉय ह्यांनीं बंगलोर येथील रोटरी कुबपुढें भाषण करतांना दुसरी पंचवार्षिक योजना आणि चलनविस्तार ह्या विषयासंबंधीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं, दुसरी पंचवार्षिक योजना वाढत्या किंमतीच्या पार्श्वभूमीवर सुरू होत आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आपली साधनसंपत्ति लक्षांत घेऊन तिच्या अनुरोधानें योजनेवर करावयाचा खर्च ठरविण्यांत आला नाहीं तर वाढत्या किंमतीच्या दुष्ट चक्रापासून आपली सुटका होणार नाहीं. गेल्या कांहीं महिन्यांत किंमती वाढल्या आहेत. नजीकच्या भविष्यकाळांतील घटनांची ही नांदीच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. चलनवृद्धीला पायबंद घालण्याच्या सरकारी उपायांचा उपयोग होणार नाहीं. कारण, चलनवृद्धि एकदां वाटचाल करूं लागली कीं ती अनिवार्यपणें आपलें काम करीत राहते. तीवर नजर राखणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना होईल तें मुकाट्यानें पहात बसावें लागण्याचा संभव आहे. सध्यां वस्तूंच्या किंमतींत जी वाढ झाली आहे तिचें कारण मुबलक चलन हें आहे; वस्तूंच्या तुटवड्यामुळें किंमती चढल्या आहेत असें नाहीं. संपत्तिसाधनांचा विचार करून पैशाची गुंतवणूक निर्बंधित करणें हा एकच उपाय चलनवृद्धीवर परिणामकारी ठरतो. नियोजन समितीच्या सल्लागार मंडळाचे सभासद कमी-अधिक प्रमाणांत जहाल राजकीय मतप्रणालीचे आहेत. कम्युनिस्ट राजवटींतील अर्थनियोजक हे प्रथम योजना आखतात आणि मग ती अंमलांत आणण्यासाठीं साधनें शोधतात. ही पद्धत लोकशाही चौकटींत बसत नाहीं. लोकशाही मार्ग स्वीकारून कमी वेगानें आर्थिक विकास घडवून आणावयाचा कीं कम्युनिझम स्वीकारून जलदीनें तो साधावयाचा, हाच आपल्या देशापुढील मूलभूत स्वरूपाचा प्रश्न आहे. ह्या प्रश्नाचा निर्णय फार महत्त्वाचा आहे.

---

### 'नागपुरी' संत्र्यांच्या बागाइतदारांना कर्जें

मध्यप्रदेशांतील सेंट्रल बँकांचे अध्यक्ष व मॅनेजर्स ह्यांची एक सभा नागपूर येथें नुकतीच झाली. त्यावेळीं सहकारी खात्याचे रजिस्ट्रारहि उपस्थित होते. संत्र्यांच्या बागाइतदारांना आपलें उत्पादन किफायतशीर विकतां यावें, ह्यासाठी त्यांना कर्जपुरवठा करण्याचें सभेंत ठरलें. म. प्र. सहकारी बँक प्रत्येक सेंट्रल बँकेला त्यासाठी ५०,००० रु. पुरवील. अशा आठ सेंट्रल बँका आहेत; म्हणजे म. प्र. सहकारी बँक एकूण ४ लक्ष रुपये पुरवील. प्रत्येक बागाइतदाराला त्याच्या पिकाच्या ५०% रक्कम कर्जाऊ मिळेल. म. प्र. ऑरेंज ग्रोअर्स असोसिएशनच्या द्वारांच संत्रीं विकण्यांत आलीं पाहिजेत, अशी कर्जाची अट राहील. ह्या व्यवस्थेमुळें पावसाळ्यांत जरूरीचे वेळीं बागाइतदारांना पैसा मिळेल; त्यासाठीं त्यांना नागपूरच्या दलालांवर विसंबून रहावें लागणार नाहीं. नागपूर, ब्रह्मपुरी, भंडारा, वर्धा, अमरावती, मोर्शी, छिंदवाडा आणि बेतुल अशा आठ बँकांतर्फे कर्जव्यवस्था होईल.

**परकीय भांडवलांत वाढ**—१९४८ ते १९५३ ह्या कालखंडांत भारतांत गुंतविण्यांत आलेल्या परदेशीय भांडवलांत ११२·१२ कोटी रुपयांची वाढ झाली, अशी माहिती राज्यसभेंत सांगण्यांत आली. भारतामधील परकीय भांडवलाची खानेसुमारी करण्याचें काम सध्या रिझर्व्ह बँकेमार्फत चालू आहे. परंतु सर्व माहिती नीट तपासून प्रसिद्ध करण्यास दोन वर्षे तरी लागतील.


## दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठे महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिकोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,८५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. [illegible], मॅनेजर.

## द्वितीय पंचवार्षिक योजना खर्चाची विषयवार विभागणी

| (१) | पहिली योजना (कोटी रु.) (२) | टक्के (३) | दुसरी योजना (कोटी रु.) (४) | टक्के (५) |
|---|---|---|---|---|
| १. शेतकी व समाज-विकास | ३५७ | १५·१ | ५६८ | ११·८ |
| (अ) शेतकी | २४१ | १०·२ | ३४१ | ७·१ |
| शेतकीविषयक कामें | १९७ | ८·३ | १७० | ३·५ |
| पशुसंवर्धन | २२ | १·० | ५५ | १·१ |
| जंगलें | १० | ०·४ | ४७ | १·० |
| मच्छिमार | ४ | ०·२ | १२ | ०·३ |
| सहकार | ७ | ०·३ | ४७ | १·० |
| किरकोळ | १ | — | ९ | ०·२ |
| (ब) राष्ट्रीय विस्तार व समाजविकास योजना | ९० | ३·८ | २०० | ४·१ |
| (क) इतर कार्यें | २६ | १·१ | २७ | ०·६ |
| ग्रामपंचायती | ११ | ०·५ | १२ | ०·३ |
| स्थानिक विकास कार्यें | १५ | ०·६ | १५ | ०·३ |
| २. पाटबंधारे व वीज | ६६१ | २८·१ | ९१३ | १९·० |
| पाटबंधारे | ३८४ | १६·३ | ३८१ | ७·९ |
| वीज | २६० | ११·१ | ४२७ | ८·९ |
| पूरनियंत्रण व इतर योजना, चौकशी वगैरे | १७ | ०·७ | १०५ | २·२ |
| ३. उद्योग व खाणी | १७९ | ७·६ | ८९० | १८·५ |
| मोठे व मध्यम उद्योग | १४८ | ६·३ | ६१७ | १२·९ |
| खनिज विकास | १ | — | ७३ | १·५ |
| छोटे व ग्रामोद्योग | ३० | १·३ | २०० | ४·१ |
| ४. वाहतूक व दळणवळण | ५५७ | २३·६ | १३८५ | २८·९ |
| रेल्वे | २६८ | ११·४ | ९०० | १८·८ |
| रस्ते | १३० | ५·५ | २४६ | ५·१ |
| रस्ता वाहतूक | १२ | ०·५ | १७ | ०·४ |
| बंदरें | ३४ | १·४ | ४५ | ०·९ |
| जहाज धंदा | २६ | १·१ | ४८ | १·० |
| अंतर्गत जल वाहतूक | — | — | ३ | ०·१ |
| नागरी विमान वाहतूक | २४ | १·० | ४३ | ०·९ |
| इतर वाहतूक | ३ | ०·१ | ७ | ०·१ |
| टपाल व तारा | ५० | २·२ | ६३ | १·३ |
| इतर दळणवळण | ५ | ०·२ | ४ | ०·१ |
| ध्वनिक्षेपण | ५ | ०·२ | ९ | ०·२ |
| ५. समाजसेवा कार्यें | ५३३ | २२·६ | ९४५ | १९·७ |
| शिक्षण | १६४ | ७·० | ३०७ | ६·४ |
| आरोग्य | १४० | ५·९ | २७४ | ५·७ |
| घरबांधणी | ४९ | २·१ | १२० | २·५ |
| मागास वर्गाचें कल्याण | ३२ | १·३ | ९१ | १·९ |
| समाजकल्याण | ५ | १·२ | २९ | ०·६ |
| कामगार व कामगार कल्याण | ७ | ०·३ | २९ | ०·६ |
| पुनर्वसाहत | १३६ | ५·८ | ९० | १·९ |
| सुशिक्षित बेकारांसाठी खास योजना | — | — | ५ | ०·१ |
| ६. इतर | ६९ | ३·० | ९९ | २·१ |
| एकूण | २३५६ | १००·० | ४८०० | १००·० |

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें मुख्य कार्य म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नामध्यें पांच वर्षांत सुमारें २५ टक्के वाढ घडवून आणणें, लोकसंख्येंत होणाऱ्या वाढीमुळें वाढलेल्या श्रमशक्तीस पुरेशा प्रमाणांत कामधंदा मिळण्याच्या संधी वाढविणें आणि आगामी योजनाकालामध्यें झरझर प्रगति साधण्यासाठी पाया तयार करण्याचे दृष्टीनें औद्योगीकरणाचे दिशेनें महत्त्वाचीं पावलें टाकणें, हें होय. दुसरी योजना ही एका अर्थी पहिल्या योजनेंत हातीं घेतलेलें विकासकार्य चालू ठेवण्याच्याच स्वरूपाची म्हणतां येईल. परंतु कोणत्या कार्यास प्राधान्य द्यावयाचें त्याबाबत मात्र निश्चित फरक आहे. या योजनेंत विशेषतः जड उद्योग व तद्नुषंगिक अशीं वाहतुकीचीं साधनें यांचे विकासावर अधिक भर देण्यांत आला आहे.

मध्य व राज्य सरकारांच्या योजनाकालांतील विकास कार्यांचा खर्च ४८०० कोटी रुपये होईल. विकासाच्या निरनिराळ्या महत्त्वाच्या कार्यांवर या खर्चाची विभागणी वरीलप्रमाणें होईल.

येथें दर्शविलेल्या एकूण खर्चामध्यें लोकांनीं रोख अगर श्रमरूपानें दिलेल्या देणग्यांचा समावेश केलेला नाहीं.

खर्चाच्या वर दिलेल्या खातेवार विभागणीवरून पहिली योजना व दुसरी योजना यांमध्यें देण्यांत आलेल्या अग्रहक्कांचा फरक दिसून येतो. सरकारी क्षेत्रांतील खर्चाच्या एकूण १९ टक्के खर्च उद्योग व खाणी यांचेवर होणार आहे. पहिल्या योजनेंत हा खर्च केवळ ८ टक्के होता. उद्योगधंदे व खाणकाम यासाठी असलेल्या एकूण ८९० कोटी रुपयांपैकीं ६९० कोटी रुपये खाणीसुद्धां मोठ्या उद्योगांसाठी ठेवलेले असून २०० कोटी रुपये छोटे व ग्रामोद्योग यांचे विकासासाठी आहेत.

योजना काळांतील एकूण खर्चाच्या २९ टक्के खर्च वाहतूक व दळणवळण यांवर होणार आहे. रेल्वेवर पहिल्या योजनेंत एकूण खर्चाच्या ११ टक्के खर्च झाला. या योजनेंत तो १९ टक्के धरला आहे. दळणवळण व वाहतुकीच्या एकूण इतर साधनांवर मिळून पहिल्या योजनेपेक्षा आतां खर्चाचें प्रमाण थोडें कमी होणार असलें तरी खर्चाच्या प्रत्यक्ष रकमेंत मात्र बरीच वाढ झालेली दिसेल.

मध्य व राज्य सरकारांच्या एकूण खर्चापैकीं सुमारें १९ टक्के वीज व पाटबंधारे यांसाठी असून आणखी १२ टक्के शेती व समाजविकास यांसाठी आहेत. या दोन बाबींवर एकूण १४८१ कोटी रुपये खर्च होतील. शेतकी व उद्योगधंदे यांमध्यें द्यावयाच्या प्राधान्यावर तौलनिकदृष्ट्या थोडासा बदल असला तरी अन्नधान्यें व कच्चा माल यांच्या उत्पादनांतील वाढ ही पंचवार्षिक योजनेच्या एकूण काळापुरतीच नव्हे तर पुढेंहि कित्येक वर्षेपर्यंत एक आवश्यक गोष्ट मानली पाहिजे. पाटबंधारे व पूरनियंत्रण यांसाठी असलेल्या एकूण ४८६ कोटी रुपयांपैकीं २०९ कोटी रुपये मागील योजनेंत हातीं घेतलेल्या योजनांसाठी असून उरलेले २७७ कोटी रुपये नव्या योजनांसाठी आहेत. विद्युत्-विकासावर होणाऱ्या ४२७ कोटी रुपयांपैकीं १६० कोटी रुपये जुन्या योजनांसाठी व २६७ कोटी रुपये नव्या योजनांसाठी आहेत. पंधरा वर्षांमध्यें सरकारी पाटबंधाऱ्यांचा लाभ मिळणाऱ्या जमिनीचें क्षेत्र दुपटीनें आणि वीजपुरवठा ६ पटीनें वाढविण्याच्या एका मोठ्या योजनेचा भाग या दृष्टीनें योजनेंतील वीज व पाटबंधाऱ्यांच्या कामाची आंखणी केलेली आहे.

सामाजिक स्वरूपाच्या कामासाठी पहिल्या योजनेंत एकूण खर्चाच्या २३ टक्के रकम खर्च झाली. ती या योजनेंत २० टक्के होईल. टक्केवारीनें बघतां शिक्षण, आरोग्य व घरबांधणी यांवर पहिल्या योजनेइतकाच खर्च होणार असला तरी प्रत्यक्ष खर्च होणारी रकम मात्र बरीच अधिक आहे.

## बँकिंग कंपन्या आणि नवीन कंपनी कायदा

नवान कंपनी कायद्यांतून योग्य त्या ठिकाणीं बँकिंग कंपन्यांना वगळण्याची दक्षता घेण्यांत आलेली आहे. परंतु, एवढ्या मोठ्या कायद्यांत कांहीं गोष्टी राहून जाणें अपरिहार्य आहे व त्यामुळें कांहीं अडचणी निर्माण होणें संभवनीय आहे.

२ ( २६ ) ह्या कलमांत मॅनेजिंग डायरेक्टराची व्याख्या दिलेली आहे. थोड्याच बँकांना मॅनेजिंग डायरेक्टर आहेत; पण कलमांतील व्याख्येप्रमाणें एकाद्या डायरेक्टरला बोर्डानें कांहीं अधिकार दिले ( जे अधिकार त्याला साधा डायरेक्टर म्हणून मिळाले नसते ) तर तो डायरेक्टर मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून समजला जाईल. त्यामुळें जे डायरेक्टर जास्त वेळ बँकेच्या कामाकडे देतात, ते व्याख्येच्या कक्षेंत येऊन मॅनेजिंग डायरेक्टर समजले जाणें अशक्य नाहीं.

४९ वें कलम सांगतें, कीं कंपनीच्या इनव्हेस्टमेंट्स तिच्याच नांवें असल्या पाहिजेत. शेअर्स किंवा सर्टिफिकिटें खरीदणें आणि विकणें हाच ज्यांचा मुख्य व्यवसाय आहे, अशांच्या इन्व्हेस्टमेंटसना मात्र माफी आहे. कंपनी आपल्या बँकरकडे शेअर्स किंवा सर्टिफिकिटें डिव्हिडंड किंवा व्याज जमा करण्यासाठी ठेवूं शकते. कंपनीनें घेतलेल्या कर्जाचे पोटीं शेअर्स किंवा रोखे कर्ज देणाराकडे ठेवणें किंवा त्याच्या नांवें करणें हेंहि कायद्यास संमत आहे. पण, बँकिंग कंपन्यांचा मुख्य व्यवसाय शेअर्स किंवा सर्टिफिकिटें खरीदणें आणि विकणें आहे असें मानलें जाईल काय ? ४९ व्या कलमाप्रमाणें, बँकांना स्वतःच्या नांवें इनव्हेस्टमेंटस् ठेवाव्या लागतील, असें त्या कलमाची भाषा तरी सांगते.

कंपनीचे रोखे कंपनीजवळ किंवा तिच्या बँकर असलेल्या शेड्यूल्ड बँकेजवळ ठेवले पाहिजेत, असें कायद्याचें कलम ४९ ( ६ ) सांगतें. बँकिंग कंपन्या पुष्कळ वेळां इतर बँकांकडून कर्जाऊ रकमा घेतात. कलम ४९ ( ५ ) प्रमाणें त्यांना कर्ज देणाऱ्या बँकेकडे रोखे ठेवतां येतील, असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. पण, रिझर्व्ह बँकेकडे रोखे ठेवणें कायदेशीर होईल काय ? कारण, रिझर्व्ह बँक ही कांहीं शेड्यूल्ड बँक नाहीं. तेव्हां शेड्यूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडून रोख्यांच्या तारणावर कर्जें कशीं घ्यावयाचीं ?

२९२ कलम सांगतें, कीं कांहीं अधिकार बोर्डानें सभेंतच वापरले पाहिजेत. बँकिंग कंपनीचा मॅनेजर, शाखेचा अधिकारी इत्यादींना अधिकार सुपूर्त करतां येण्याची कायद्यांत तरतूद आहे. परंतु, त्यांतील अटींच्या संबंधांत थोडी साशंकता आहे; बँकिंग कंपन्या कर्ज घेतां येण्याचा अधिकार इतका व्यापक देऊन ठेवतील, कीं कांहींच अडचण येऊंच नये. शाखेच्या अधिकाऱ्याला कर्ज घेण्याचा अधिकार दिला, तरी कर्जांत ठेवींचाहि समावेश होईल काय, अशीहि शंका काढण्यांत येत आहे.

---


**सिमेंटची टंचाई** —त्रावणकोर–कोचीन राज्यांत सध्यां सिमेंटचा तुटवडा फारच जाणवत आहे. त्याचप्रमाणें विजेचा तुटवडाहि जाणवत आहे. अर्णाकुलम् चेंबर ऑफ कॉमर्सनें ह्या प्रकरणीं राजप्रमुखांच्या सल्लागाराकडे एक खलिता धाडला आहे. राज्यांतील सिमेंटची गरज भागविण्यासाठी इतर कारखान्यांकडून तातडीनें सिमेंट मागविण्यांत यावें अशी विनंती खलित्यांत करण्यांत आली आली आहे


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
राष्ट्रीय बचत योजना
व्याज ३ टक्के
माहितीसाठीं लिहा अगर भेटा:
मुख्य ऑफीस: सारस्वत बँक बिल्डींग, मुंबई ४.
शाखा: फोर्ट, दादर, माहीम, बेळगांव, पुणें

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

किर्लोस्कर
आपल्या उन्हाळी पिकांची जोपासना करण्यासाठी
★
सेंट्रिफ्युगल पंप
(टाइप:-एन. वी. एस.)
★

अधिक माहिती मागवा
किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी

## नियोजन मंडळाची कार्यक्रम मूल्यमापन संघटना
### समाज विकास व राष्ट्रीय विस्तार कार्यक्रमाचा आढावा
### ( १ )

" केवळ प्रत्यक्षांत साध्य झालेल्या गोष्टींपेक्षा, अधिकाऱ्यांच्या व जनतेच्या दृष्टिकोनांत झालेला बदल हें गेलीं तीन वर्षें कार्यवाहीत असलेल्या समाजविकास कार्यक्रमाचें खरें फलित होय." असें मत नियोजन मंडळाच्या कार्यक्रम मूल्यमापनसंघटनेनें समाज विकास व राष्ट्रीय विस्तार कार्यक्रमाच्या तिसऱ्या वर्षातील कामकाजाचा आढावा घेतांना व्यक्त केलें आहे. हा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. अहवालांत पुढें म्हटलें आहे:— " प्रगतीची आपली आकांक्षा जनतेनें निःसंदिग्धपणें व्यक्त केली असून, आपली खात्री पटेल अशी कोणतीहि गोष्ट स्वीकारण्याचीच नव्हे तर त्यासाठी पदरचा पैसा मोडण्याचीहि तयारी जनतेनें दर्शविलेली आहे. या कार्यक्रमामुळें आपल्या तांतडीच्या गरजा पुऱ्या करण्यास मिळालेल्या संधीचें स्वागत करून वाढत्या प्रमाणांत आपला वांटाहि जनतेनें उचलला आहे."

समाज विकास व राष्ट्रीय विस्तार कार्यक्रमाचें ठराविक कालावधीनें तपशीलवार मूल्यमापन करण्यासाठी नियोजन मंडळानें स्थापन केलेल्या कार्यक्रम मूल्यमापनसंघटनेनें वरील कार्यक्रमाबाबत सादर केलेला हा तिसरा अहवाल आहे. कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना, तो प्रथम सुरू करण्यांत आला तेव्हां जीं उद्दिष्टें व दृष्टिकोन पुढें ठेवण्यांत आलीं तीं प्रत्यक्षांत येतात कीं नाहीं हें पाहणें हा या मूल्यमापनामागील हेतु असतो.

कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंबंधांत अहवालांत मतप्रदर्शन करण्यांत आलें असून, अंमलबजावणीस जोर यावा म्हणून कांहीं महत्त्वाच्या सूचनाहि करण्यांत आल्या आहेत. खात्याखात्यांत एकसूत्रता राहण्याबद्दल आणि ग्रामसेवकाच्या स्थानाची यथायोग्य व्याख्या ठरविण्याबाबत व तांत्रिक स्वरूपाची खातीं सुधारण्याबाबत या सूचना आहेत. तसेंच पंचायतींच्या भूमिकेसंबंधांत तपशीलवार विवेचन करून नव्या समाजरचनेशीं जुळण्याच्या दृष्टीनें पंचायतींचें संघटनात्मक स्वरूप बदलावें अशी शिफारस करण्यांत आली आहे.

#### प्रगतीचें मान कसें आहे ?

कार्यक्रमाच्या प्रगतीचा वेग कसा आहे त्याचा उल्लेख करतांना, निरनिराळ्या विभागांत कमी अधिक प्रमाणांत प्रगति होत असल्याचें अहवालांत म्हटलें आहे. तथापि कोणताहि प्रयत्न यशस्वी होणें ही गोष्ट तो करणाऱ्या यंत्रणेइतकीच त्या विकास कार्यक्रमाच्या आशयावर अवलंबून असते.

एकंदरीतपणें कार्यक्रमाची प्रगति होत रहावी म्हणून अहवालांत तीन गोष्टी सुचविण्यांत आल्या आहेत. त्या अशा:— १. तांत्रिक खात्यांची सुधारणा, २. लोकायत्त संस्थांची सुधारणा आणि ३. एका बाजूस विस्तारयंत्रणा व दुसऱ्या बाजूस तांत्रिक खातीं व लोकायत्त संस्था यांच्यांत सुसूत्रता रहावी म्हणून योग्य अशी कारभार यंत्रणेची तरतूद.

कार्यक्रमाच्या मर्यादित मुदतींत अमुक एक गोष्टी साध्य कशा होतील याबाबत अवास्तव काळजी करीत बसण्याविरुद्ध अहवालांत इशारा देण्यांत आला आहे. कारण त्यामुळें जनतेचें सहकार्य सहज सुलभ असणाऱ्या कांहीं थोड्या खेड्यांतच विकास कार्यक्रम हातीं घेण्याकडे लक्ष दिलें जातें आणि इतर बऱ्याच खेड्याकडे दुर्लक्ष होतें. तसेंच, पार पाडावयाच्या गोष्टींतहि केवळ चटकन् डोळ्यांत भरणाऱ्या गोष्टींकडे लक्ष दिलें जाऊन अधिक शाश्वत व मूलभूत सुधारणेच्या पण कमी नेत्रदीपक गोष्टी राहून जातात असें अहवालांत म्हटलें आहे.


स्थापना सन १९३५ टे. न. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★
श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे,
श्री. म. बा. बेंडे, श्री. ज्ञा. मा. मनसूख.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर
शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. कें. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

## सहकारी चळवळीची प्रगति

### रिझर्व्ह बँकेचा आढावा

रिझर्व्ह बँकेच्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्याचा, सहकारी चळवळीविषयक १९५२–५४ चा आढावा प्रसिद्ध झाला आहे. त्यांत सहकारी चळवळीच्या प्रगतीची तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. अहवालाचे मुदतींत सोसायट्यांची संख्या १,८५,६५० वरून १,९८,६०० वर गेली; म्हणजे त्यांत ७% वाढ झाली. सोसायट्यांच्या सभासदांची संख्या १३८ लाखांवरून १५२ लाखांवर गेली; म्हणजे त्यांत १०·१% वाढ झाली. सोसायट्यांचें एकूण खेळतें भांडवल २०६ कोटी रुपयांचें ३५३ कोटी रुपये झालें.

अन्नधान्याच्या निर्मितींत वाढ, पुरवठा कमी असणाऱ्या मालाचें योग्य वांटप, निवृत्त सैनिक व निर्वासित ह्यांची पुनर्वसाहत, हातमागाच्या धंद्यावरील संकटाचें निवारण, इत्यादि बाबतींत सहकारी चळवळीनें उपयुक्त कामगिरी बजावली असल्याचें आढाव्यांत म्हटलें आहे. आंध्र राज्यांत गुंटकल येथें सहकारी स्पिनिंग मिलची स्थापना विणकरांच्या सोसायट्यांनीं केली, ही घटना विशेष महत्त्वाची आहे. "जगाच्या टेक्स्टाइलच्या प्रगतींत ही गिरणी तीर्थक्षेत्रासारखी आहे" असे उद्गार फोर्ड फौंडेशनच्या औद्योगिक तज्ज्ञांनीं १९५४ मध्यें काढले आहेत.

प्रगतीप्रमाणें कांहीं दोषस्थळेंहि आढाव्यांत नमूद करण्यांत आलीं आहेत. सहकारी सोसायट्यांनीं शेतकऱ्यांना केलेला कर्जपुरवठा अपुरा होता, त्यामुळें शेतकऱ्यांना इतर ठिकाणांहून कर्जें घ्यावीं लागलीं व तीं सहकारी संस्थांपेक्षा अधिक त्वरेनें मिळूं शकलीं. कर्जाच्या परतफेडीच्या बाबतींत बहुतेक संस्थांचा अनुभव पूर्वीइतका समाधानकारक नाहीं. अर्थात्, शेतीच्या मालाची किंमत उतरली त्याचा तो कांहीं अंशीं परिणाम होता.

शेतमालावर क्रिया करून त्याची विक्री घडवून आणण्याचे कामीं, कांहीं थोडे अपवाद सोडल्यास, एकंदर चित्र मोठें आकर्षक नाहीं. नियंत्रणें दूर झालीं, त्याचा बऱ्याच स्टोअर्सना धक्का बसला व कित्येक बंद करावे लागले. नियंत्रित मालाचें वांटप करणाऱ्या कित्येक मार्केटिंग सोसायट्यांची अशीच गत झाली. घरबांधणी व पुरवठा ह्याहि बाबतींत म्हणण्याजोगी प्रगति झाली नाहीं. तथापि, सरकारचा सहकारी चळवळीकडे पहाण्याचा सहानुभूतीचा दृष्टिकोन, सामाजिक व आर्थिक न्यायाच्यासाठी सहकारी चळवळीचा उपयोग करून घेण्याचें सरकारी धोरण, रूरल क्रेडिट सर्व्हे रिपोर्टच्या सूचना व त्यांचा अंगीकार, ह्या सर्व गोष्टींमुळें ह्यापुढील प्रगति अधिक आशादायक होईल अशी अपेक्षा आहे.

---

**एकच शिक्षक असणाऱ्या शाळा**—हैदराबाद सरकारनें चालू वर्षीं एकच शिक्षक असलेल्या ५०० शाळा काढण्याचें ठरविलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत अशा २,५०० शाळा स्थापन करण्याचें उद्दिष्ट सरकारनें ठेवलें आहे. दर वर्षीं ५०० नव्या शाळा काढण्यांत येतील. ज्या मागासलेल्या भागांत मुळींच शाळा नाहींत त्या भागांना प्राधान्य देण्यांत येईल. हैदराबाद राज्यांत अजिबात शाळा नसलेलीं सुमारें ८,००० खेडीं आहेत.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१–१२–५४ अखेर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. २,१०,००० |
| ठेवी | रु. ७८,९७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. — शं. ह. [illegible], बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## 'अर्थ' [illegible]

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं [illegible] व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) [illegible]